MHOS130000011983

नि.दि.दावा क्र.१८४/१९८३
विलास विरुध्द धोंडीबा

## <u>निशाणी क्र.२०३ च्या अर्जावरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादी यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला प्रतिवादी क्र.२/अ चा 'उलटतपास नाही' असा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र.२/अ यांचा उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणात सदर प्रतिवादी क्र.२/अ तर्फे प्रतिज्ञापत्र निशानी क्र.२०० वर दाखल करण्यात आलेले होते. परंतू, वादीने सदर प्रतिवादीचा उलटतपास घेतला नसल्यामुळे दिनांक २३.०७.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.२/अ चा उलटतपास नाही असा आदेश झाली आहे. वादीस सदर प्रतिवादीबाबत माहिती नसल्यामुळे व काही कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे सदरचा आदेश पारीत झाला आहे. प्रस्तुत प्रकरणाचे निकोप निर्णयासाठी वादीतर्फे सदर प्रतिवादीचा उलटतपास घेणे आवश्यक आहे म्हणून वादीस सदर प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यो योग्य आहे अन्यथा सदर प्रतिवादीचे कधीही पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल. करीता वादीने, वादीतर्फे 'उलटतपास नाही' असा पारीत झालेला आदेश रद्द करण्यात येऊन प्रतिवादी क्र.२/अ चा उलटतपास घेणेस परवानगी देण्यात येऊन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर जोरदार आक्षेप घेऊन प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रस्तुत अर्ज मंजुर करावयाचे निर्णयास आल्यास सदर प्रतिवादीवर रक्कम रु.२५,०००/- इतका दंड बसवण्याची विनंती केली आहे.

०४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरण हे निरंतर मनाई मिळणेबाबत दाखल केले आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.२/अ ने सरतपासाचे शपथपत्र दिनांक १६.०७.२०२४ रोजी दिले आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादीचे विधिज्ञ वारंवार पुकारले असता ते गैरहजर असुन त्यांनी सदर दिवशी कोणताही अर्ज अभिलेखावर

दाखल केलेला दिसुन येत नाही. सबब, दिनांक २३.०७.२०२४ रोजी मे.कोर्टाने वादीतर्फे 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, वादीने आजतागायत निशानी २०० वरील आदेशाची पुर्तता केलेली नाही. परंतू, प्रकरणाचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादी क्र.२/अ यांचे दोघांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन प्रकरण गुणदोषांवर निकाली करणे न्यायाचे होईल. प्रस्तुत प्रकरणात वादीतर्फे प्रतिवादी क्र.२/अ चा उलटतपास घेण्यास झालेल्या विलंबाचा कालावधी पाहता प्रस्तुतचा अर्ज वादी यांचेवर रक्कम रुपये ५००/– इतका दंड बसवून खालील आदेशान्वये मंजुर करण्यांत येतो.

## <u>आदेश</u>

१. **निशानी २०३** कडील अर्ज वादी यांनी रक्कम **रु.५००/– (अक्षरी पाचशे रुपये फक्त)** प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यांत येतो.

२. निशानी २०० वर वादीतर्फे 'उलटतपास नाही' बाबत केलेला आदेश रद्द करण्यांत येतो व वादी यांना प्रतिवादी क्र.२/अ यांचा उलटतपास घेण्याची संधी देण्यांत येते.

३. पक्षकारांनी आदेशाची नोंद घेण्यात यावी.

Digitally signed by PATIL SWATI JAMBUKUMAR
Date: 2024.08.21 11:06:20 +0530

दिनांक : २०.०८.२०२४

( **श्रीमती एस.जे.पाटील** )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. न्यायनिर्णय /आदेश यामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय /आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन. व्ही. कोळी, लघुलेखक ग्रेड–३ |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, भूम. |
| आदेश दिनांक | : | २०.०८.२०२४ |
| आदेशावर पिठासिन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेचा दिनांक | : | २०.०८.२०२४ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | : | २१.०८.२०२४ |